# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थप्रशासन विभाग

---

## परिपत्रक

जा.क्र. अप्रवि / सेवार्थ / 522 / 2015 दिनांक :– 19 / 06 / 2015

विषय :– एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ :– 1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012 / प्र.क्र. 169 / 8–अे, दि. 23.11.2012

2. मा.सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण 10–11 / प्र. 100 / कोषा (प्र.–5), दिनांक 25 जूलै 2014

3. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012 / प्र.क्र. 169 / 8–अे दि. 26 ऑगस्ट 2014

संदर्भ क्र. 2 च्या पत्रानुसार महाराष्ट्र शासनाने या विद्यापीठास असे कळविले आहे की, एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये कस्टमाईज्ड व्हर्जनमध्ये मंजूर पदांची माहीती भरतांना संबंधित अधिकारी / कर्मचारी कार्यरत असलेल्या पदांची संख्या आणि प्रत्यक्षात प्रणालीत भरलेल्या या संदर्भातील संख्या यामध्ये तफावत आढळून येते. तरी आपण आपल्या आस्थापनेवर असलेली मंजूर पदे आणि प्रत्यक्षात एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये तयार करण्यात आलेली पदे यामध्ये काही तफावत आहे का याबाबतची माहीती मा. कुलसचिव कार्यालयास तसेच नियंत्रक कार्यालयास न चुकता लेखी स्वरूपात कळवावी.

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन व लेखा अधिकारी, अकोला / नागपूर यांना कळविण्यात येते की, माहे **जून 2015 च्या जूलै 2015 मध्ये देय होणारे वेतन** एसएयु सेवार्थ प्रणालीमधून निर्गमित करावयाचे आहे.

सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये माहे जून 2015 च्या जूलै 2015 मध्ये देय वेतन निर्गमित करून घेण्यात यावेत. तसेच येणा–या अडचणी आढळून आल्या तरी संबंधित वेतन देयक संगणक प्रणालीत

निर्गमित करावे. असे निर्गमित केलेले देयक संबंधित वेतन लेखाधिकारी (डीडीओ–2) **यांच्याकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक 29 जून 2015 पर्यंत Forward करण्यात यावे.**

जर याबाबत विलंब झाला तर माहे जून 2015 चे वेतन दिनांक 1 जुलै 2015 रोजी वितरित करणे कोणत्याही परिस्थितीत शक्य होणार नाही.

याबाबत अडचण आल्यास नियंत्रक कार्यालयास त्वरीत संपर्क साधून आलेल्या अडचणी दूर करून घ्याव्यात.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रतिलीपी :–
1. **मा. कुलगुरू,** डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे स्विय सहाय्यक यांना माहीतीसाठी सविनय सादर.
2. **मा. कुलसचिव**, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीतीसाठी
3. श्री. सुनिल व्यास, मा. सहसंचालक (सुधारणा) लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मंत्रालयासमोर, मुंबई.
4. श्रीमती मिनाक्षी सिंग, ॲक्सेचर कंपनीचा प्रतिनिधी यांना टीसीएस कंपनी योग्य माहीतीसाठी सविनय सादर
5. वित्त सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भोसले नगर, पुणे.
6. **वेतन व लेखाधिकारी, अकोला/नागपूर यांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांची वेतन देयके एसएयु सेवार्थ प्रणालीत विहीत कालावधीचे वेतन देयक तयार झाली किंवा नाही याची खात्री करून घ्यावी, नसल्यास ती विहीत कालावधीत तयार करून घेण्याकरीता योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरून करावी.**
7. **सर्व विभाग प्रमुख/सर्व नियंत्रण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके उपरोक्त पध्दतीनुसार तयार करून घेण्याकरीता आपल्या स्तरावरून कडक निर्देश देण्यात यावेत.**